# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

२३ नोव्हेंबर, २०१९



☎ : 07172-264300
: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

✍: 7276494810 (PRO)


# घरगुती वादावरून सख्या भावाला मारहाण करणाऱ्या आरोपीस शिक्षा

पोलीस स्टेशन भद्रावती अंतर्गत घरगुती कारणावरून सख्या भावाला आणि पुतण्याला मारहाण करून जखमी करणाऱ्या आरोपीस २२/११/२०१९ रोजी **श्री.डी.के. भेंडे, सत्र न्यायाधीश वरोरा, जि. चंद्रपुर यांनी** शिक्षा ठोठावली.

पोलीस स्टेशन भद्रावती अंतर्गत मौजा काटवल तुकुम येथे राहणारे फिर्यादी नामे मनोहर कवडु गजभिये वय ३८ रा. काटवल ता. भद्रावती आणि यातील आरोपी नामे नथ्थु कवडु गजभिये वय ४१ रा. काटवल भद्रावती हे दोघेही नात्याने सख्ये भाउ असुन दिनांक ३१/०७/२०१० रोजी फिर्यादी हे त्यांच्या वडीलांच्या नावाने असलेल्या जमिनीचे कागदपत्र काही कामासाठी आरोपीकडुन मागीतले असता आरोपीने ते दिले नाही. आणि याविषयावर वाद घालुन फिर्यादीसोबत झगडा भांडण करून आरोपीने फिर्यादीला दगड फेकुन मारले व कुऱ्हाडीने डोक्यावर मारून गंभीर जखमी करून जिव घेण्याचा प्रयत्न केला. आणि फिर्यादीची पत्नी आणि मुलगा भांडण सोडविण्यासाठी गेले असता, आरोपीने फिर्यादीच्या मुलाच्या हातावर सुरीने वार करून जखमी केले. अशा फिर्यादीच्या आणि मेडिकल रिपोर्टवरून पोलीस स्टेशन भद्रावती येथे अप.क्र. १८१/२०१० कलम ३०७,३४१,३२३ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास तत्कालीन पोउपनि श्री. डब्लु. बी. देशमुख, यांनी पुर्ण करून गुन्हयातील आरोपींविरूद्ध सबळ पुराव्यानिशी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

न्यायालयाचे सुनावणी दरम्यान सदर प्रकरणात न्यायालयाने साक्षीदार तपासले व योग्य पुराव्याच्या आधारे दिनांक २२/११/२०१९ रोजी **आरोपी नामे नथ्थु कवडु गजभिये वय ४१ रा. काटवल भद्रावती** यास कलम ३२७ भादंवि मध्ये ३ वर्ष कारावासाची शिक्षा व १०,०००/—रू दंड, न भरल्यास ७ महिने शिक्षा श्री. डी. के. भेंड, सत्र न्यायाधीश वरोरा जि. चंद्रपुर यांनी ठोठावली आहे. सदर प्रकरणामध्ये सरकार तर्फे ॲड. मिलींद देशपांडे, सरकारी अभियोक्ता, चंद्रपूर आणि कोर्ट पैरवी म्हणुन सफौ. दिलीप पोहाणे, पोलीस स्टेशन भद्रावती यांनी काम पाहिले.

————————————————————————————————